14 APR 2017

## जळगांव जिल्हा दल
## पोलीस भरती-२०१७

पोलीस भरती-२०१७ करीता खुल्या प्रवर्गातील ६६, अनुसूचीत जाती प्रवर्गातील १४, आणि अनुसूचीत जमाती प्रवर्गातील ०४ अशा एकुण ८४ जागांसाठी पोलीस भरती प्रक्रीया दिनांक २२-०३-२०१७ ते दिनांक ०५-०४-२०१७ या कालावधीत पुर्ण करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने लेखी परिक्षा दिनांक ०९-०४-२०१७ रोजी घेण्यात आलेली आहे.

मैदानी चाचणी आणि लेखी चाचणी यातील एकुण गुणांच्या आधारावर जाहिरातीत नमुद प्रमाणे प्रवर्ग निहाय आणि समांतर आरक्षणांतर्गत प्रारुप गुणवत्ता यादी (PROVISIONAL LIST) व प्रारुप प्रतिक्षायादी यासोबत प्रसिध्द करण्यात येत आहे.

प्रारुप गुणवत्ता यादीतील व प्रारुप प्रतिक्षा यादी मधील उमेदवार यांनी कागदपत्र पडताळणीसाठी दिनांक १८-०४-२०१७ रोजी सकाळी ०८.३० वाजता मंगलम हॉल, पोलीस कवायत मैदान, जळगांव येथे खालील मुळ कागदपत्रांसह तसेच त्यांचा ०१ झेरॉक्स संच साक्षांकीत केलेला (Attested) व चेस्ट नंबर कार्ड सह न चुकता हजर रहावे.

१) शाळा सोडल्याचा दाखला / १० वी पास प्रमाणपत्र / बोनाफाईड प्रमाणपत्र
२) १२ वी पासचे मार्कशिट / प्रमाणपत्र / पदवीधर असल्यास पदवी गुणपत्रक / प्रमाणपत्र
३) डोमेसाईल प्रमाणपत्र
४) जात प्रमाणपत्र / जातवैधता प्रमाणपत्र
५) समांतर आरक्षणाचे प्रमाणपत्र (महिला, खेळाडु, प्रकल्पग्रस्त, भुकंपग्रस्त, पोलीस पाल्य, होमगार्ड उमेदवारांसाठी)
६) नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र ( खुल्या प्रवर्गातील महिला उमेदवारांसाठी, एस.सी., एस.टी. वगळुन )
७) महिला आरक्षणाचे प्रमाणपत्र
८) माजी सैनिकांसाठी डिस्चार्ज बुक
९) खेळाडु उमेदवारांनी सक्षम प्राधीकरणाकडुन प्राप्त केलेले क्रिडा विषयक प्रमाणपत्र आणि विभागीय उपसंचालक यांनी सदरहु क्रिडा प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत व खेळाडु कोणत्या संवर्गासाठी पात्र ठरतो याबाबत प्रमाणीत केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
१०) होमगार्ड उमेदवारांसाठी त्यांना गृहरक्षक दलात जाहिरातीच्या दिनांकास म्हणजे २३-०२-२०१७ रोजी ०३ वर्ष पुर्ण झाल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
११) चेस्ट नंबर कार्ड
१२) अलिकडील काळातील ०४ पासपोर्ट फोटो
१३) चारचाकी वाहन चालविण्याचा परवाना
१४) एमएस-सीआयटी प्रमाणपत्र

टिप :- १) ओळख पटविण्यासाठी आधारकार्ड, पॅनकार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, महाविद्यालयाचे ओळखपत्र, मतदान कार्ड इत्यादी पैकी एक मुळ कागदपत्रे सोबत असणे आवश्यक आहे. आधारकार्ड आवश्यक आहे.
२) वरील कागदपत्रे दिनांक २०-०३-२०१७ पावेतोची किंवा त्यापुर्वीची असणे आवश्यक आहे.
३) विवाहीत उमेदवारांसाठी रेशनकार्डाची झेरॉक्स प्रत

पोलीस अधिक्षक कार्यालय जळगांव

(डॉ.जालिंदर सुपेकर)
पोलीस अधिक्षक,जळगांव.



C:\Users\SHEED2\Desktop\Police requritment-17\Police requritment -2017..docx